महासागर
नागपूर
वृत्तसागर
■ शनिवार, दि. ५, जुलै २०२५ ■

# मामाने भाचीला सव्वा कोटीने गंडवले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

आदिवासी शिक्षक संस्थेत विविध पदांवर नोकरी लावून देतो अशी बतावणी करून मामाने सख्ख्या भाचीलाच 1 कोटी 28 लाखांनी गंडविल्याची घटना हुडकेश्वर हद्दीत न्यू अमरनगर येथे उघडकीस आली. भारती संजय हरकंडे (50) रा. न्यू अमरनगर असे फसगत झालेल्या भाचीचे नाव आहे.

भारतीचे मामा निळकंठ दशरथ दहीकर (60) रा. वडसा देसाईगंज (जि. गडचिरोली) यांची शांतीवन अपंग निराधार आदिवासी विकास शिक्षण नावाची संस्था आहे. संस्थेचा संपूर्ण कारभार दहीकर यांच्या हाती असून त्यांचे नातेवाईकच या संस्थेत पदाधिकारी आहेत. 2011 ते 2024 दरम्यान दहीकर यांनी भारती यांना संस्थेचे अध्यक्षपद देतो असे बोलून त्यांच्याकडून 48 लाख रुपये घेतले. त्याचप्रमाणे भारती यांच्या बहिणीच्या पतीला संस्थेत नोकरी देतो असे बोलून त्यांच्याकडून 45 लाख रुपये घेतले.

दहीकर यांनी एकूण 1 कोटी 28 लाख रुपये घेऊनसुद्धा कुणालाही नोकरी न देता त्यांची फसगत केली. भारती यांनी दहीकर यांना पैसे परत मागितले असता 48 लाखांचा धनादेश दिला. परंतु, धनादेश बँकेत न वटता परत आला. आपली फसगत झाल्याचे लक्षात येताच भारती यांनी पैसे परत मागितले असता दहीकर यांनी पैसे देण्यास नकार दिला. याप्रकरणी भारती हरकंडे यांच्या तक्रारीवरून हुडकेश्वर पोलिसांनी निळकंठ दहीकर, सविता निळकंठ दहीकर (52), आशू निळकंठ दहीकर (30), राहुल धनोजी दहीकर (35) आणि गुलाब धोंडबा दहीकर (45) यांच्याविरुद्ध फसवणुकीचा गुन्हा दाखल केला.

# अंमली पदार्थ विक्रेत्यांवर मोक्का

## शस्त्रे आणि ड्रग्जसह अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

नागपूर ग्रामीण पोलिसांनी अंमली पदार्थ विरोधी गुन्ह्यामध्ये सहभागी दहा आरोपींच्या टोळीविरुद्ध लावला मकोका म्हणजेच महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा लावल्याची माहिती नागपूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक डॉ. दिलीप पाटील यांनी पत्रपरिषदेत दिली.

या टोळीचा म्होरक्या आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा (वय २५), रोहित देशराज सूर्यवंशी (वय ३२), सुरज उर्फ बारीक रमेश वरणकर (वय २५), विश्वास राहुल सोलंकी (वय २७), अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग (वय २९), गब्बर दत्तूजी जुमळे (वय ३०), उदयभान गंगासागर चव्हाण (वय ३२), लखनसिंग उर्फ विजय सिंग दिलीप सिंग सिकलकर (भटीया, वय ३५ ) शाहरूप उर्फ सारोप रमेश राजपूत (वय २३), राकेश उर्फ सोनु शिवलाल सूर्यवंशी (वय ३०) या दहा आरोपींविरूध्द महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायद्या अन्वये कारवाई करण्यात आली आहे.

यापूर्वी २७ एप्रिल २०२५ रोजी पोलिसांना खबऱ्यांनी आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा हा वलनी येथील अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याच्या घरी हजर असल्याची माहिती दिली. त्यांच्याकडे पिस्तुलासह इतर शस्त्रे असल्याची माहितीही खबऱ्याने दिली.

त्यावरून पोलिसांनी अभिषेक उर्फ छोटू अनिल सिंग याच्या घरी धाड टाकली असता आरोपी आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा आणि गब्बर दत्तुजी जुमळे मिळुन आले. घरझडतीमध्ये पोलिसांनी १०२८.०५ ग्रॅम अंमली पदार्थ, ६ अग्निशस्त्रे, ३६ जिवंत काडतुसे, २ रिकाम्या पुंगळी, ८ अँड्रॉईड फोन आणि सिमकार्ड असा एकूण २,७१,८०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला. तसेच आरोपींना अटक केली.

आरोपी आषिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा आणि त्याच्या इतर साथीदारांची गुन्हेगारी करणारी टोळी असून ते संघटीतरित्या आर्थिक फायद्यासाठी अंमली पदार्थांची विक्री करतात. तसेच परिसरात टोळीची दहशत पसरविणसाठी खून, खूनाचा प्रयत्न करणे, प्राणघातक शस्त्र बाळगणे, अवैध अग्निशस्त्र विक्री करणे अवैध दारू विक्री करण्यासारखे गंभीर स्वरूपाचे गुन्हे करीत असतात. टोळीचा म्होरक्या आशिष उर्फ गुल्लू राजबहादूर वर्मा हा टोळीतील साथीदारांव्यतिरीक्त आणखी नव-नवीन सदस्यांना सोबत घेऊन गुन्हे करीत असतो. या टोळीवर अनेक गंभीर गुन्हे दाखल आहे. वेळोवेळी कारवाई करूनही टोळीच्या कारवाया थांबत नसल्याने मकोका लावण्यात आल्याचे भुजबळ यांनी सांगितले.

# शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीसाठी एसआयटी

## आमदार संदीप जोशींच्या प्रश्नावर शासनाचे उत्तर



■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

नागपूर विभागात झालेल्या घोटाळ्यासंदर्भात चौकशी करण्यासाठी विधिमंडळ अधिवेशन समाप्त झाल्यानंतर एक महिन्याच्या आता मुख्यमंत्र्यांच्या परवानगीने आयएएस, आयपीएस, विधी अधिकारी यांचा संयुक्त सहभाग असलेल्या चौकशी समितीची घोषणा करण्यात येईल, अशी माहिती शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी आमदार संदीप जोशी यांनी विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात दिली.

विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात आज शुक्रवारी प्रश्नोत्तराच्या तासात आमदार संदीप जोशी यांनी नागपूर विभागात गाजत असलेल्या शिक्षक भरती घोटाळ्याच्या चौकशीसंदभार्तील प्रश्न उपस्थित केले. आमदार संदीप जोशी यांनी या घोटाळ्याचा प्रारंभापासून पाठपुरावा केला. या प्रकरणात एसआयटी नेमण्याची मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली होती. मुख्यमंत्र्यांनी या मागणीला हिरवा कंदिल दाखविला होता. मात्र अद्याप एसआयटी समिती नेमण्यात आली नाही. ही समिती कधीपर्यंत घोषित करण्यात येईल, विशेष म्हणजे या घोटाळ्याची व्याप्ती चांदा ते बांदा अशी आहे.

त्यामुळे घोषित करण्यात येणाऱ्या एसआयटीची कार्यकक्षा संपूर्ण महाराष्ट्रभर असावी. घोषित करण्यात येणारी एसआयटी 2 मे 2012 नंतर संपूर्ण राज्यात झालेल्या नियुक्त्या, बदल्या, शाळा हस्तांतरण तसेच शाळांना अल्पसंख्यांक दर्जा देण्याच्या प्रकरणातील राज्यव्यापी घोटाळ्याची चर्चा करणार काय, यापूर्वी शिक्षण आयुक्तांनी नियुक्ती मान्यता प्रकरणात दोषी घोषित केलेल्या 59 शिक्षणाधिकारी यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई तत्काळ करणार काय, शिक्षण आयुक्तांनी प्रेषित केलेल्या फाईल्स मंत्रालयात मागील पाच-सहा वर्षांपासून दाबून ठेवणाऱ्या शिक्षण विभागातील झारीतील शुक्राचार्यावर कारवाई करणार काय, हा घोटाळा उघडकीस येऊ नये म्हणून घोटाळ्याशी संबंधित शेकडो नस्त्या नष्ट करण्यात आल्या. याबाबत संबंधितांविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार काय, या प्रश्नांचा समावेश होता.

या प्रश्नांना उत्तर देताना शिक्षण राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांनी मुख्यमंत्र्यांच्या परवानगीने अधिवेशन संपल्यानंतर एक महिन्याच्या आत एसआयटीमधील अधिकारी आणि सदस्यांची घोषणा करण्यात येईल. 59 शिक्षणाधिकाऱ्यांसंदर्भातील मागील पाच सहा वर्षांपासून प्रलंबित असलेल्या फाईलसंदर्भात तातडीने दखल घेत ती फाईल मागवून घेण्यात येईल.

# महाल भागात आज वीज नाही

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :



नागपूर शहरातील महाल परिसरात शनिवार, 5 जुलै रोजी सकाळी 9 ते सायंकाळी 4 या वेळेत वीजपुरवठा खंडित राहणार आहे. महावितरणने दिलेल्या माहितीनुसार, मागील काही दिवसांपासून सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे महाल विभागातील 11 केव्ही महाल-1 उच्चदाब वीजवाहिनीच्या काही खांबांभोवतीची माती वाहून गेली आहे. यामुळे 2 ते 3 खांब कोसळण्याची शक्यता निर्माण झाली असून, या वाहिनिच्या स्थलांतरणाचे आणि त्यांची तातडीने दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

कोतवाली चौक ते कल्याणेश्वर मंदिर दरम्यानच्या या वीजवाहिनीची दुरुस्ती आणि स्थलांतर करण्याचे काम हाती घेण्यात येणार आहे. या कामामुळे केळीबाग रोड, महाल चौक, कल्याणेश्वर मंदिर, किल्ला रोड, गायत्री अपार्टमेंट, झेंडा चौक, भोसला वेद शाळा परिसर, मुंशी गल्ली आणि ढोबळे गल्ली या भागांतील ग्राहकांचा वीजपुरवठा बाधित होईल. हे काम अत्यंत आवश्यक आणि तातडीचे असल्याने नागरिकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# घरफोडी करणाऱ्या परप्रांतिय चोरट्यांना अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

कामासाठी नागपुरात येऊन रात्रीच्या वेळी घरफोडी करीत लाखोचा ऐवज चोरून नेणाऱ्या दोघा परप्रांतिय चोरट्यांना गुन्हे शाखेच्या घरफोडी विरोधी पथक आणि पारडी पोलिसांनी अटक केली. दोन्ही चोरट्यांच्या ताब्यातून 11 लाख 12 हजाराचा मुद्देमाल जप्त केला.

संदीप खेमचंद टेंभरे (26) ओमसाईनगर, सिवनी आणि महेंद्र उर्फ गोलू रामकुमार कुशवाह (35) विझावाडा, सिवनी (म.प्र.) अशी या चोरट्यांची नावे आहेत. काही दिवसांपूर्वी दोन्ही आरोपी कामासाठी नागपुरात आले होते. एका कंत्राटदाराकडे ते कामाला होते. काम करीत असताना ते बंद घराची टेहळणी करीत होते. रात्रीच्या बंद घराचे कुलूप तोडून लाखोचा माल लंपास करायचे.

21 जून 2025 रोजी नागेश्वरनगर येथील गणेश हाऊसिंग सोसायटी येथे राहणारे अनुप भगवान वाघमारे (34) हे आपले घर कुलूपबंद करून कुटुंबियांसह पुलगाव येथे नातेवाईकाकडे गेले होते. ही संधी साधून दोघांनीही मुख्य दाराचे स्क्रू काढून घरात प्रवेश केला आणि कपाटात ठेवलेले सोन्याचांदीचे दागिने व 1 हजार रुपये असा 3 लाख 30 हजाराचा ऐवज चोरून नेला होता. दुसऱ्या दिवशी सकाळी सातच्या सुमारास शेजाऱ्यांना वाघमारे यांच्या घराचे दार उघडे दिसले. शेजाऱ्यांनी ही माहिती वाघमारे यांना दिली. वाघमारे यांच्या तक्रारीवरून पारडी पोलिसांनी घरफोडीचा गुन्हा दाखल केला होता. घरफोडी विरोधी पथक आणि पारडी पोलिस या घटनेचा समांतर तपास करीत होते. पोलिसांनी शहरातील सीसी कॅमेऱ्याची तपासणी केली असता संदीपचे छायाचित्र दिसून आले. त्यादिशेने पोलिसांनी तपास केला असता दोन्ही चोरटे हे सिवनी येथे रहात असल्याची माहिती पोलिसांना मिळली. पोलिसांनी सिवनी येथे जाऊन दोघांनाही ताब्यात घेतले. नागपूरला आणून त्यांची कसून चौकशी केली असता त्यांनी वाघमारे यांच्या घरी घरफोडी केल्याची कबुली दिली. त्याचप्रमाणे पारडी आणि मानकापूर परिसरात प्रत्येकी 3 अशा 6 ठिकाणी घरफोडी केल्याची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून 11 लाख 12 हजाराचा मुद्देमाल जप्त केला. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दोन्ही चोरट्यांना जुगाराचा बराच नाद आहे. जुगाराची हौस भागविण्यासाठी ते घरफोडी करायचे.

# फरार आरोपीला अटक

## लग्न समारंभात केली होती तरुणाची हत्या

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

यशोधरानगर पोलिसांनी ठाण्यांतर्गत आयोजित विवाह सोहळ्यात घडलेल्या खून प्रकरणातील फरार मुख्य आरोपी बिरजू दीपक वाढवे (33) रा. मायानगर, जरीपटका याला तब्बल 4 महिन्यानंतर अटक केली आहे. फेब्रुवारी महिन्यात यशोधरानगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत श्री छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवनासमोर बिरजूने आपल्या साथीदारांसह विहंग रंगारी (23) रा. सिद्धार्थनगर, टेकानाका या युवकाची निर्घृण हत्या केली होती. याप्रकरणी पोलिसांनी आतापर्यंत 9 आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला असून त्यात एका अल्पवयीनाचा देखील समावेश आहे. पोलिसांनी या प्रकरणात बिरजू आणि त्याच्या साथीदारांविरुद्ध खून आणि मकोका अंतर्गत गुन्हा नोंदविला होता.

त्याचे साथीदार सुजल दिलीप उईके, पियूष शेखर रामटेके, अजिंक्य सुरेंद्र सयाम, राहुल उर्फ दादू फकीरा वरखडे, सोनू उर्फ सोन्या अंकुश गेडाम, आर्यन लंकेश उईके, लखन दीपक वाढवे आणि यश उर्फ अक्कू पारस पाटील यांना आधीच अटक करण्यात आली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फेब्रुवारी 2025 मध्ये यशोधरानगर ठाण्यांतर्गत भिलगाव परिसरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज सांस्कृतिक भवन मंगल कार्यालयासमोर विहंग रंगारीच्या मित्राच्या बहिणीचा लग्न समारंभ सुरू होता. या दरम्यान आरोपी बिरजू वाढवे त्याच्या मित्रांसह तेथे आला. त्याचे विहंगच्या मित्राच्या बहिणीवर एकतर्फी प्रेम होते. लग्नाला आल्यानंतर बिरजूने पाहुण्यांना शिविगाळ करण्यास सुरुवात केली. विहंगने बिरजूला समजावण्याचा प्रयत्न केला. या दरम्यान बिरजूने विहंगवर चाकूने हल्ला केला. बिरजूचा मित्र आरोपी आर्यन याने सिमेंटचा ब्लॉक उचलून विहंगच्या छातीवर वार केला. उर्वरित आरोपींनीही त्याला बेदम मारहाण केली. विहंगचा मित्र जखमी अवस्थेत त्याला मेयो येथे घेऊन गेला, जिथे प्राथमिक तपासादरम्यान त्याला मृत घोषित करण्यात आले. यशोधरानगर पोलिसांनी कलम 103(2), 3 (5) आयपीसी अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

### सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपींना अटक

पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे आरोपींची ओळख पटवून शोध मोहीम सुरू केली आणि एका अल्पवयीन मुलासह 8 जणांना ताब्यात घेतले. आरोपी बिरजू फरार होता. बिरजू वारंवार त्याचे स्वरूप आणि लपण्याची ठिकाणे बदलून पोलिसांना गुंगारा देत होता. अखेर बुधवारी पोलिसांनी त्याला अटक केली. तो वेगवेगळ्या युवकांचे टोळके तयार करून गुन्हे करत असल्याची माहितीही समोर आली आहे. त्यामुळे, अटकेनंतर यशोधरानगर पोलिसांनी कलम 111 (2) आयपीसी अंतर्गतही कारवाई केली. ही कारवाई यशोधरानगरचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक रमेश खुणे, द्वितीय पोलिस निरीक्षक सुहास राऊत, उपनिरीक्षक सदाशिव कणसे, परिविक्षा उपनिरीक्षक अमोल राठाडे, कॉन्स्टेबल गणेश गुप्ता, किशोर देवांगन, प्रशांत कोडपे, उपकॉन्स्टेबल प्रशांत लांजेवार, सनी माटेल, रोहित रामटेके, रितेश दुधे, अमोल भेंडेकर, राहुल शेट्टी, नीतेश मिश्रा यांनी कारवाईत सहकार्य केले.

# जेईई, नीटसाठी लाखो रुपयांचे प्रशिक्षण मोफत

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

आयआयटी आणि मेडिकल प्रवेशासाठी विद्यार्थी मोठ्या प्रमाणात शिकवणी वर्गात जातात. यासाठी लाखो रुपयांचे शुल्कही आकारले जाते. त्यामुळे अनेक हुशार विद्यार्थी पैशाच्या अभावी शिकवणी पासून वंचित असतात. अश्या विद्यार्थ्यांना मोफत प्रशिक्षण देण्याची योजना सरकारने सुरू केली आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे लाखो रुपये शुल्क वाचणार आहे. तसेच, जे विद्यार्थी हे प्रशिक्षण घेणार त्यांना महिन्याला सहा हजार रुपयाचे मासिक विद्यावेतन मिळणार आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणेमार्फत महाराष्ट्रातील अनुसूचित जातीच्या उमेदवारांसाठी जेईई आणि नीट या प्रवेश परीक्षांचे निःशुल्क अनिवासी प्रशिक्षणासाठी ऑनलाईन प्रक्रीया सुरु करण्यात आली आहे. बार्टीमार्फत मुंबई, पुणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, लातूर व नागपूर या ठिकाणी प्रत्येकी जेईई - १०० व नीट - १०० जागांकरिता प्रशिक्षण राबवण्यात येणार आहे.

प्रशिक्षणासाठी विद्यार्थी इयत्ता अकरावी(विज्ञान) शाखेत प्रवेश घेतलेला असावा. विद्यार्थ्याजवळ महाराष्ट्रातील अनुसूचित जातीचा व अधिवास दाखला असावा. कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न ८ लाखाच्या घरात असावे. विद्यार्थी दिव्यांग असल्यास ४० टक्के पेक्षा जास्त दिव्यांगत्व असल्याच्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत सादर करावी. जेईई आणि नीट प्रवेश परीक्षा पूर्व प्रशिक्षणासाठी नमुद केल्याप्रमाणे महिला ३० टक्के, दिव्यांग ५ टक्के, अनाथ १ टक्के, वंचित ५ टक्के जागा आरक्षित असतील.
प्रशिक्षणातील सर्व जागांसाठी प्राधान्याने इयत्ता १० वीच्या गुणांच्या आधारे गुणवत्ता निहाय उमेदवारांची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणाचा कालावधी २४ महिन्यांचा असणार आहे. प्रशिक्षण काळात ७५ टक्के पेक्षा जास्त उपस्थिती राहिल्यास विद्यार्थ्यांना दरमहा रुपये ६००० एवढे विद्यावेतन दिल्या जाणार आहे. पात्र विद्यार्थ्यांना पुस्तक संचाकरीता प्रती विद्यार्थी रुपये ५००० एवढी एकरकमी रक्कम अदा करण्यात येणार आहे.

या प्रशिक्षण योजनेचा लाभ घेण्यासाठी ऑनलाईन अर्ज सादर करायचा आहे. ऑनलाईन अर्ज सादर करण्याची शेवटची तारीख ३० जुलै आहे. अधिकाधिक विद्यार्थ्यांनी लिंकवरुन ऑनलाईन नोंदणी करण्याचे आवाहन महासंचालक बार्टी मार्फत करण्यात आले आहे.

## माविम आणि पर्यटन विभागाच्या संयुक्त विद्यमाने

# एकदिवसीय कार्यशाळा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :




महिला आर्थिक विकास महामंडळ आणि पर्यटन विभाग नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने नुकतीच केंद्र व्यवस्थापक, सहयोगीनी, आणि पिंक ई-रिक्षाच्या महिला प्रतिनिधी यांच्यासाठी एकदिवसीय कार्यशाळा पर्यटन विभागाच्या सभागृहात घेण्यात आली. पर्यटन संचालनालयाचे उपसंचालक प्रशांत सवाई, माविमचे सहायक जिल्हा समन्वय अधिकारी मोहन घनोटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

याप्रसंगी उपसंचालक प्रशांत सवाई यांनी पर्यटन विभागाद्वारे देण्यात येणारी प्रोत्साहने व सवलती तर मोहन घनोटे यांनी माविमद्वारे राबविण्यात येणाऱ्या योजना तथा गरिब व गरजू महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षमीकरण करण्याच्या पद्धतींचे अवलोकन कसे केले जाते याबद्दल माहिती दिली. प्रगती पाचबुधे यांनी पिंक ई-रिक्षाला देण्यात येणाऱ्या सवलती आणि व्यवसायाचे प्रकार व क्षेत्रतसेचयोजना निवडीचे निकष समजावून सांगितले. आस्था सीएमआरसीच्या व्यवस्थापक करुणा कनोजे-मनगटे, फैजाने ताज सीएमआरसीच्या केंद्र व्यवस्थापक सोनाली शेंडे, स्त्रीशक्ती साधन केंद्र, पिंक ई-रिक्षा करीता अर्ज केलेल्या महिला प्रतिनिधी उपस्थित होत्या.

## वाहनचोरास अटक

नागपूर : रस्त्याच्या कडेला कुलूपबंद अवस्थेत उभ्या असलेल्या दुचाकीला चोरून नेणाऱ्या राहुल राजू हटेवार (24) कुंदनलाल गुप्तानगर यास पोलिसांनी अटक केली. 27 जून रोजी सकाळी 9 च्या सुमारास संतोषीनगर येथील अभिषेक ईश्वर वानकर (30) हे काही कामानिमित्त नरसाळा रोडवरील बेलदारनगर येथे गेले होते. अभिषेकने त्याच्या ॲक्सीस सुझुकीला कुलूपबंद केले आणि ते कामानिमित्त बाहेर गेले. की संधी साधून राहुलने बनावट चावीने दुचाकीचे कुलूप उघडून दुचाकी चोरून नेली. दुपारी 12.30 च्या सुमारास अभिषेक घटनास्थळी आले त्यांना ठेवलेल्या ठिकाणी दुचाकी दिसून आली नाही. याप्रकरणी हुडकेश्वर पोलिसांनी वाहनचोरीचा गुन्हा दाखल करून तपास सुरू केला होता. तपासात सीसी कॅमेऱ्यात राहुल दुचाकी चोरून नेताना दिसला. पोलिसांनी त्याचा शोध घेऊन दुचाकीसह त्याला अटक केली.

# गडचिरोली शिक्षणाधिकारी रवींद्र सलामेला अटक

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

बहुचर्चित बोगस शालार्थ आयडी प्रकरणी पुन्हा एकाला अटक करण्यात आली. रवींद्र पंजाबराव सलामे (45) रा. नेहरूनगर, बेला (भंडारा)असे अटकेतील आरोपीचे नाव आहे. सदर पोलिसांनी त्याला गुरूवारी न्यायालयात हजर केले. न्यायालयाने 6 जुलैपर्यंत पोलिस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले. जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयात अधीक्षक पदावर असताना (2023) त्याने पराग नानाजी पूडके (लाखनी, भंडारा) याच्या बोगस प्रस्तावाला मान्यता दिल्याचा आरोप आहे.

बोगस शालार्थ आयडी प्रकरणातील पहिला आरोपी पराग पुडके आहे. मुन्ना तुलाराम वाघमारे यांच्या तक्रारीवरून सदर पोलिसांनी त्याला अटक केली होती. त्याचे वडील नानाजी पुडके यांचे जेवनाळा (भंडारा) येथे नानाजी पूडके विद्यालय आहे. नानाजी पुडके हे शाळेचे अध्यक्ष आहेत. एसआयटीने त्यालाही अटक केली होती. सध्या तो जामिनावर आहे. पराग पुडके हा कोणत्याही शाळेत सहाय्यक शिक्षक पदावर नियुक्त नसताना तसेच त्याला कुठलाही अनुभव नसताना त्याची थेट मुख्याध्यापकपदी नियुक्ती करण्यात आली. महेंद्र म्हैसकर याच्या मदतीने एस के बी (यादव नगर, नागपूर) या शाळेच्या लेटरहेडवर बनावट अनुभव प्रमाणपत्र तयार करून घेतले. याच बोगस लेटरहेडचा वापर करून शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद यांचे कार्यालयात प्रस्ताव सादर करण्यात आला. त्याच्या प्रस्तावाल सलामे याने मान्यता दिली. याआरोपावरून सलामेला अटक करण्यात आली.

सदर पोलिसांनी या प्रकरणात आतापर्यंत 14 लोकांना अटक केली आहे. त्यापैकी म्हैसकर हा कारागृहात असून इतर 13 आरोपींना जामिन मिळाला आहे. तर चिंतामण वंजारीला प्रोडक्शन वॉरंटवर कारागृहातून ताब्यात घेण्यात आले आहे. न्यायालयाने त्याला 4 जुलैपर्यंत पोलिस कोठडी सुनावली आहे.

### एकाच दिवसात प्रस्तावाला मान्यता

पराग पुडके याचा बनावट प्रस्ताव तयार केला. प्रस्तावाला बनावट प्रमाणपत्र जोडले आणि तो प्रस्ताव सलामे याच्याकडे सादर केला. प्रस्तावाला मंजुरी देण्यासाठी 45 दिवसांचा अवधी असतो. प्रस्तावाला मान्यता देण्यापूर्वी जिल्हा परिषद, शिक्षण विभाग, नागपूरकडून पडताळणी केली जाते. मात्र, पराग पुडके प्रकरणात सलामे याने पडताळणी न करताच एकाच दिवसात प्रस्तावाला मान्यता दिली.

### पराग पुडकेला अटक झाल्यापासून सलामे होता गायब

बोगस शालार्थ आयडी प्रकरणात पराग पुडके हा पहिलाच आरोपी आहे. त्याला अटक झाल्यापासून सलामे हा गायब होता. अलिकडेच त्याची नेमणूक शिक्षणाधिकारी माध्यमिक कार्यालय (गडचिरोली) येथे झाली. सलामे हा कार्यालयात रूजू झाला आणि पुन्हा गायब झाला.

# राज्यात महिला सुरक्षित आहेत काय? : अरूण गाडे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

महाराष्ट्रात महिला तर सुरक्षित नाहीत त्यासोबतच महिला अधिकारी देखील सुरक्षित आहेत काय असा प्रश्न म. आ. कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाचे अध्यक्ष अरुण गाडे यांनी पत्रपरिषदेत उपस्थित केला.

पत्रकारांना माहिती देताना गाडे यांनी सांगितले की, नागपूर येथील समाजकल्याण विभागात सुकेशनी तेलगोटे या सहायक आयुक्त या पदावर कार्यरत आहेत. 27 जून रोजी याच कार्यालयातील कर्मचारी सुशील शिंदे हा तेलगोटे यांच्या कॅबिनजवळ आला. कॅबिनच्या दाराला लाथ मारून तो आत घुसला. त्यावेळी तेलगोटे यांच्यासोबत तीन ते चारजण एका विषयावर चर्चा करीत होते. शिंदेने तेलगोटे यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली. कार्यालयातील काही कर्मचाऱ्यांनी त्याला रोखण्याचा प्रयत्न केला असता कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केली. इतर कर्मचारी गोळा झाल्याने शिंदेने पळ काढला.

सुशील शिंदे हा अनुकंपा तत्वावर नोकरीला लागला आहे. नेहमीच तो कार्यालयात दारू पिऊन येतो. त्याचप्रमाणे कार्यालयातील इतर कर्मचाऱ्यांना रात्री बेरात्री फोन करून त्रास देत असतो. ऐके दिवशी रात्री एकच्या सुमारास शिंदे हा तेलगोटे यांच्या घरी गेला आणि दार ठोठावले. त्यामुळे तेलगोटे घाबरल्या. एका मागासवर्गिय अधिकाऱ्याला त्याने पेटवून देण्याची धमकी दिली होती. त्याचप्रमाणे तेलगोटे यांना त्रास देण्यास सुरुवात केली. याप्रकरणी पोलिसांनी शिंदेवर ॲट्रासिटीचा गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी अशीही मागणी गाडे यांनी यावेळी केली. पत्रपरिषदेला शामराव हाडके, राजेश ढेंगरे, रवी पोथारे, प्रा. राहुल मून, संजय आंभोरे, रणजीत रामटेके, अरविंद पाटील, माया उके, शोभा अंबादे, हरीश पाटील आदी उपस्थित होते.

# अपघातात मेकॅनिकचा पाय निकामी

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

विचित्र अपघातात एक दुचाकीस्वार गंभीर जखमी झाला. ट्रकच्या चाकाखाली आल्याने त्यांचा उजवा पाय पूर्णतः निकामी झाला. ही घटना हुडकेश्वर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. नितीन वाघमारे (55) रा. आरएस लॉनमागे, पिपळा रोड, हुडकेश्वर, असे जखमीचे नाव आहे.
मिळालेल्या माहितीनुसार, नितीन हे मेकॅनिक असून बेकरीतील ओव्हन दुरूस्तीचे काम करतात. गुरूवारी सायंकाळी ते कामानिमित्त रामेश्वरीकडे जात होते. मानेवाडा चौकात उड्डाणपुलासाठी खोदकाम करण्यात आले आहे. या खोदकामातील माती रस्त्यावर आली असून दुपारी आलेल्या पावसामुळे येथे घसरण तयार झाली. मानेवाडा चौकातून जात असताना त्यांच्या वाहनामागे एक दुचाकी आणि ट्रक होता. दरम्यान ट्रक चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून नितीन यांच्या मागे असलेल्या दुचाकीस्वाराला धडक दिली. तो दुचाकीस्वार नितीन यांच्या वाहनावर येऊन धडकला. या अपघातात तो दुचाकीस्वार एका बाजूला तर नितीन ट्रकच्या बाजूला पडले. यातून सावरण्याचा प्रयत्न करीत असतानाच ट्रकचे चाक त्यांच्या उजव्या पायावरून गेले. या घटनेने परिसरात खळबळ उडाली. माहिती मिळताच हुडकेश्वरचे ठाणेदार ज्ञानेश्वर भेदोडकर पथकासह घटनास्थळी पोहोचले. गंभीर जखमी नितीन यांना उपचारार्थ रुग्णालयात रवाना केले. त्यांची प्रकृती धोक्याबाहेर असल्याची माहिती मिळाली आहे.

# मनपाचे दिव्यांग सर्वेक्षण अंतिम टप्प्यात

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :





नागपूर महानगरपालिकेद्वारे दिव्यांगांचा एकत्रित डाटा संकलीत करण्यासाठी दिव्यांग सर्वेक्षण करण्यात आले. महात्मा गांधी सेवा संघ यांच्या माध्यमातून मनपाच्या आशा सेविकांद्वारे सुरू असलेले सर्वेक्षण अंतिम टप्प्यात असून त्याला नागपूरकरांनी उत्तम प्रतिसाद दर्शविला आहे. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि नागपूर महानगरपालिकेद्वारे राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ मिळविण्यासाठी हे सर्वेक्षण अत्यंत आवश्यक असून नागरिकांनी मनपाच्या आशा सेविकांना योग्य माहिती देऊन सहकार्य करावे, असे आवाहन नागपूर महानगरपालिकेद्वारे करण्यात येत आहे.

मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त वसुमना पंत यांच्या मार्गदर्शनात आणि वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. दीपक सेलोकर व समाज विकास अधिकारी डॉ. रंजना लाडे यांच्या नेतृत्वात मनपाच्या आशा सेविकांमार्फत 21 प्रकारच्या दिव्यांगत्वाची ओळख करून घेण्यासाठी दहाही झोनमध्ये हे सर्वेक्षण सुरू आहे. याकरिता आशा सेविकांना 2 ते 11 एप्रिल 2025 दरम्यान प्रशिक्षण देखील देण्यात आले आहे.

दिव्यांगांच्या सर्वेक्षणामुळे पुढील काळात दिव्यांगांच्या उत्थानासाठी कृती आराखडा निश्चित होणार आहे. अनेक दिव्यांग माहितीअभावी व कागदपत्रांच्या अभावी योजनांपासून वंचित राहतात. या सर्व कल्याणकारी योजनांचा दिव्यांगां लाभ पोहोचविण्यासाठी सर्वेक्षण महत्वाचे पाऊल आहे. दिव्यांगांचे सर्वेक्षण करताना दिव्यांगत्वाचे प्रकार, त्यांचे यूडीआयडी कार्ड, आधार कार्ड तसेच इतर माहिती देखील घेतली जात आहे. ज्यामुळे पुढील काळात त्याची पूर्तता करुन त्यांना योजनांपासून लाभान्वित करण्यात येईल.

नागपूर शहरांमधील काही भाग वगळता सामान्यजन, मध्यमवर्गीय यांच्यामध्ये दिव्यांग सर्वेक्षणाच्या बाबतीत प्रचंड उत्साह दिसून येत आहे. मात्र उच्चभ्रू वस्त्यांमध्ये आशा सेविकांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. अंतिम टप्प्यातील वस्तुनिष्ठ दिव्यांग सर्वेक्षणासाठी सर्व नागरिकांनी सहकार्य दर्शवावे व आपल्या घरातील दिव्यांगाची नोंद करून घ्यावी. जेणेकरून, एकही दिव्यांगजन कल्याणकारी योजनांपासून वंचित राहू नये, ही नैतिक जबाबदारी समजून सहकार्य करावे, असे आवाहनही मनपातर्फे करण्यात येत आहे.

## देहव्यापार करवून घेणाऱ्या महिलेस अटक

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी स्वतःच्याच घरी पीडित महिलांकडून देहव्यापार करवून घेणाऱ्या एका महिलेस गुन्हे शाखेच्या युनिट 5 च्या पथकाने अटक केली. वंदना अनिल मेश्राम (50) हिचे आर्यनगर येथील महालक्ष्मी रेसीडेन्सी येथे चौथ्या मजल्यावर फ्लॅट आहे. या फ्लॅटमध्ये तिने देहव्यपार सुरू केला होता. स्वतःच्या फायद्यासाठी ती पीडित मुलींना पैशाचे आमिष दाखवून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेत असे. फ्लॅटमध्ये दररोज नवीन नवीन लोक येत असल्याने फ्लॅटमधील लोकांना संशय आला. त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली. युनिट 5 च्या पथकाने वंदनाच्या फ्लॅटवर पाळत ठेवली. गुरुवारी दुपारी पोलिसांनी वंदनाच्या फ्लॅटवर धाड घातली असता एका खोलीत पीडित तरुणी ग्राहकासोबत मिळून आली. पोलिसांनी वंदनाच्या ताब्यातून 2 मोबाईल, रोख 2 हजार रुपये आणि इतर साहित्य असा 32 हजार 348 रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. याप्रकरणी कोराडी पोलिस ठाण्यात पीटा कायद्यान्वये गुन्हा नोंदवून वंदनाला अटक केली आणि पीडित तरुणीची सुटका केली. तरुणीला महिला सुधारगृहात पाठविण्यात आले.

# माजी नगरसेवक चौधरी यांना अटकपूर्व जामीन मंजूर

### फुटाळा तलावाची जमीन हडपल्याचे प्रकरण

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

जिल्हा आणि सत्र न्यायाधीश जोगळेकर यांच्या न्यायालयाने माजी नगरसेवक कमलेश चौधरी यांना जामीन मंजूर केला. फुटाळा तलावाची जमीन हडप करण्याचा खटला न्यायालयात प्रलंबित होता. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने चौधरी यांना 30 हजार रुपयांच्या जातमुचलक्यावर अटकपूर्व जामीन मंजूर केला. फुटाळा तलावालगतची 5.4 एकर जमीन गेल्या 100 वर्षांपासून कमलेश चौधरी यांच्या वडिलांकडे होती. 1984 मध्ये पीकेव्हीने ही जमीन पंजाबराव कृषी विद्यापीठाची असल्याचा दावा केला होता.

त्यानंतर दिलीप चौधरी यांनी न्यायालयात प्रतिकूल ताबा दावा केला होता जो न्यायालयाने मान्य केला. 1987 मध्ये पीकेव्हीने पुन्हा दुसरा दावा केला. 2023 मध्ये हा दावा फेटाळण्यात आला. 2023 मध्ये कमलेश चौधरी यांनी सिटी सर्व्हेमध्ये प्रमाणित प्रत मागितली, ज्यामध्ये दिलीप चौधरी यांचे नाव भाडेपट्टाधारक होते.

कमलेश यांनी सिटी सर्व्हेकडे रेकॉर्ड दुरुस्तीसाठी अर्ज दिला ज्यामध्ये असे कोणतेही कागदपत्र रेकॉर्डवर नव्हते. या संदर्भात सिटी सर्व्हे अधिकाऱ्याने सदर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. कमलेश चौधरीविरुद्ध फसवणूक आणि बनावटगिरीचा गुन्हा दाखल केला.

### राजकीय कट रचून एफआयआर दाखल

या खटल्याच्या सुनावणीदरम्यान, बचाव पक्षातर्फे बाजू मांडणारे वकील प्रकाश जयस्वाल, वकील आशिष नायक, वकील राज बघेल आणि वकील अविनाश बालपांडे यांनी न्यायालयाला सांगितले की, हा बनावट एफआयआर पोलिसांनी राजकीय कट रचून दाखल केला आहे आणि हा दिवाणी खटला आहे. त्याची प्रमाणित प्रत सिटी सर्व्हेमधूनच मिळाली आहे आणि किती वर्षांपूर्वी उत्परिवर्तन झाले हे माहित नाही. मूळ प्रत पोलिसांकडेच आहे, त्यामुळे कोठडीची आवश्यकता नाही. सरकारी वकिलांच्या वतीने ॲड. नितीन तेलगोटे यांनी युक्तिवाद केला. दोन्ही बाजू ऐकल्यानंतर न्यायालयाने कमलेशला अटकपूर्व जामीन मंजूर केला.

# पर्यायी निवासाच्या व्यवस्थेची सिद्धेश्वर झोपडपट्टीवासीयांची मागणी



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :

मानेवाडा येथे 300 आदिवासी कुटुंबाची वस्ती असलेली सिद्धेश्वर झोपडपट्टी आहे. मूलभूत सुविधांच्या अभावी हे बांधव नरकमय जीवन जगण्यास बाधीत झाले आहेत. जर सरकार आमच्याकडून मते मागते तर आम्हाला सुविधायुक्त पर्यायी व्यवस्था करणं त्यांचे देणे लागते. अशी मागणी सिद्धेश्वर झोपडपट्टीवासीयांकडून समाजवादी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशफाक अब्दाली यांनी पत्रकार परिषदेत केली.

स्वच्छ पाणी, नियमित वीज, साफसफाई, शौचालये, रस्ते शिक्षण, आरोग्य या मूलभूत गरजांपासून वंचित असलेल्या आदिवासी बांधवांचे आधार कार्ड, रेशनकार्ड सरकारने बनवून दिले आहे. निवडणूक आली की आमची मते घेतली जातात पण सुविधा दिल्या जात नाही. तेव्हा पर्यायी निवासी व्यवस्थेसाठी आमदार मोहन मते यांच्या घराला घेराव घालण्याचे पाऊल न्याय मागणीसाठी उचलणार आहेत.अशी माहिती पत्रकार परिषदेत देण्यात आली.

## २८७५ वाहन चालकांवर कारवाई

नागपूर : वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 2,875 वाहन चालकांवर कारवाई करून 4,14,700 रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारूबंदी कायद्यान्वये 6 व एनडीपीएस अन्वये 3 अशा 9 प्रकरणात 9 आरोपींवर कारवाई करून 9,296 रुपयांचा माल जप्त केला. तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये 1 प्रकरणात 1 जुगाऱ्यावर कारवाई करून 10,520 रुपयांचा माल जप्त करण्यात आला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली. या पुढेही कारवाई प्रभावीपणे राबविण्यात येणार असून वाहन चालकांनी वाहन चालविताना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे आवाहन नागरिकांना करण्यात आले.

## ब्रिक्स सीसीआयच्या मानद सल्लागारपदी प्रियंका शक्ती ठाकुर यांची नियुक्ती

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :



ब्राझील, रशिया, भारत, चीन, दक्षिण आफ्रिका, इराण, इजिप्त, इथिओपिया, युएई आणि इंडोनेशिया या ब्रिक्स+ देशांनी आपापसातील आर्थिक विकास आणि राजकीय स्थैयार्साठी स्थापन केलेल्या ह्यब्रिक्स+ (ब्रिक्स चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री) या संस्थेचे अध्यक्ष हरवंश चावला यांनी नागपूरच्या प्रियंका शक्ती ठाकुर यांची मानद सल्लागार म्हणून नियुक्ती केली आहे.

ब्रिक्स चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री ही संस्था या मैत्रीपूर्ण राष्ट्रांमध्ये आर्थिक सहकार्याचा एक प्रेरणादायी स्रोत म्हणून कार्य करते. विविध उपक्रम, मंच आणि नेटवर्किंग मधून व्यवसाय फुलवणे, नवोन्मेष करणे आणि विस्तार साधणे यासाठी हे व्यासपीठ आहे. जागतिक आर्थिक घडामोडींच्या गुंतागुंतीचा वेध घेणे आणि ब्रिक्स देशांमधील सहकार्य वाढवणे, हे या संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट आहे.

ख्यातनाम रंगकर्मी, अभिनेत्री, दिग्दर्शिका व निमार्ती प्रियंका ठाकूर यांना २०२३ सालचा संगीत नाटक अकादमीचा मानाचा उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

नव्या पिढीची नवदृष्टी, अनुभव आणि कौशल्य संस्थेसाठी मोलाची असल्याचे मान्य करून वाणिज्य, व्यवस्थापन आणि महानाट्य लेखन-दिग्दर्शन या क्षेत्रातील तज्ज्ञ असलेल्या प्रियंका शक्ति ठाकुर यांची ही नियुक्ती करण्यात आली आहे. ही बाब केवळ नागपूरसाठीच नव्हे तर संपूर्ण विदर्भ व महाराष्ट्रासाठी गौरवाची आहे.

# तेलंगणाचे 3 युवक गांजासह सापडले

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ४ :

**विक्रेताही पोलिसांच्या जाळ्यात**

गुन्हे शाखा युनिट एकच्या पथकाने प्रतापनगर पोलिस ठाण्यांतर्गत गस्तीदरम्यान संशयास्पदरित्या फिरत असलेल्या तेलंगणा येथील तीन युवकांना ताब्यात घेतले. झडतीदरम्यान त्यांच्याजवळील बॅगमध्ये पोलिसांना 1 किलो 792 ग्रॅम गांजा मिळाला. चौकशीदरम्यान त्यांनी हा गांजा नागपूरच्या विक्रेत्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी विक्रेत्यालाही अटक केली. मायकल जेकब हॅरी अॅन्थोनी (32), साईकुमार काशीपट्टी अनुतुल्ला (32), दीपक नरेंद्र कट्टी (23) तिन्ही रा. बंसलपेठ, तेलंगणा आणि मोहम्मद सादिक मोहम्मद रौफ (43) रा. सतरंजीपुरा, लकडगंज अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत.

मंगळवारी रात्री 11.30 वाजताच्या सुमारास युनिट एकचे पथक प्रतापनगर ठाण्यांतर्गत गस्त घालत होते. छत्रपती चौकातून कोका-कोला फॅक्टरी चौकाकडे जाणाऱ्या मार्गावर पोलिसांना मायकल, साईकुमार आणि दीपक हे संशयास्पदरित्या बॅग घेऊन फिरताना दिसले. पोलिसांनी तिघांनाही चौकशीसाठी ताब्यात घेतले. चौकशीदरम्यान त्यांनी तेलंगणा येथील असून परत जाण्यासाठी वाहनाच्या प्रतीक्षेत असल्याची माहिती दिली. त्यांच्या बॅगमधून उग्र दर्प येत होता. त्यामुळे त्यांच्या बॅगची झडती घेतली असता त्यात 1 किलो 792 ग्रॅम गांजा मिळाला.

पोलिसांनी गांजा जप्त करून तिघांनाही अटक केली. सखोल चौकशीदरम्यान गांजाबाबत विचारले असता त्यांनी सतरंजीपऱ्यात राहणाऱ्या मोहम्मद सादिक याच्याकडून खरेदी केल्याची माहिती दिली. पोलिसांनी सादिकच्या घरी धडक देऊन त्यालाही अटक केली. चारही आरोपींविरुद्ध प्रतापनगर ठाण्यात एनडीपीएस ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

# भारतीय संसदेद्वारा आयोजित राष्ट्रीय परिषदेत

## माजी महापौर दयाशंकर तिवारी व नंदा जिचकार सहभागी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ४ :



भारतीय संसदेद्वारे संवैधानिक लोकशाही आणि राष्ट्र उभारणी मजबूत करण्यात शहरी स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका याविषयावर हरीयाणातील मानेसर येथे आयोजित राष्ट्रीय परिषदेमध्ये नागपूरचे माजी महापौर दयाशंकर तिवारी, नंदा जिचकार, माजी उपमहापौर संदीप जाधव व दीपराज पार्डीकर सहभागी झाले होते. या राष्ट्रीय परिषदेला लोकसभेचे अध्यक्ष ओम बिरला यांनी प्रामुख्याने मार्गदर्शन केले.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत देशभरातील विविध शहरातील महापौर आणि उपमहापौर सहभागी झाले होते. या राष्ट्रीय परिषद मध्ये हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग तसेच मध्यप्रदेशचे मंत्री कैलास विजयवर्गीय प्रामुख्याने उपस्थित होते.

भारतीय संसदेतर्फे पहिल्यांदा या प्रकारची राष्ट्रीय परिषद आयोजित केली होती. या परिषदेमध्ये महाराष्ट्रातील ४० पेक्षा जास्त प्रतिनिधींनी सहभाग नोंदविला. या राष्ट्रीय परिषदेत विविध विषयांवर परिसंवाद झाले.

या परिषदेतील एका परिसंवादात सहभाग घेताना माजी महापौर श्रीमती नंदा जिचकार यांनी या परिषदांमधून लोकशाहीसोबतच देशातील स्थानिक स्वराज्य संस्था मजबूत होण्यास चालना मिळणार असल्याचे सांगितले.

त्याचप्रमाणे माजी महापौर दयाशंकर तिवारी यांनी महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या व महानगरपालिकांच्या बैठकीमध्ये प्रश्ननोत्तरे होत असल्याची माहिती यावेळी दिली. लोकसभा अध्यक्ष ओम बिरला यांनी महानगरपालिकांच्या बैठकीमध्ये प्रश्नोत्तराचा तास सुरू करण्याची सूचना केली होती. महानगरपालिकांच्या बैठकांमध्ये प्रश्नोत्तरे होत असल्याने जनतेचे प्रश्न सोडविण्यास मदत होत असल्याचे दयाशंकर तिवारी यांनी यावेळी सांगितले.

# महासागर प्रभाग वार्ता

## वानाडोंगरीतील बंद पथदिवे कधी सुरू होणार

● राजेश मेश्राम
नागपूर, दि. ४:

वानाडोंगरी येथील प्रभाग क्र. १ येथील अनेक वस्त्यांमधील पथदिवे मागील अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत या परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे.

यशवंतराव चव्हाण अभियांत्रिकी महाविद्यालयापासून ते शितला माता मंदिर, उगले ले आऊट, मेश्राम ले आऊट, मातोश्रीनगर येथील पथदिवे मागील अनेक दिवसांपासून बंद अवस्थेत आहेत. आधीच या मार्गावरील रस्त्यांची दयनिय अवस्था आहे. जागोजागी खड्डे पडले आहेत. त्यातच अंधाराची भर पडली आहे.

पावसाचे पाणी खड्डयात साचत असते. खड्डयातील पाण्याचा अंदाज येत नसल्याने अनेक दुचाकीस्वार रस्त्यावर पडून जखमी होतात.तरी वानाडोंगरी नगर परिषदेने या समस्याकडे लक्ष देऊन पथदिवे सुरू करावेत अशी मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे.

## सडक पोकळ झाल्याने रस्त्यावर जीवघेणा खड्डा

● प्रमोद जांभुळकर
नागपूर, दि. ४:



रस्त्यावरील जीवघेणा खड्डा

पाईप लाईन दुरुस्तीसाठी ओसीडब्लूच्या कर्मचाऱ्योनी खोदलेल्या खड्डयामुळे सडक पोकळ झाल्याने रस्त्यावर जीवघेणा खड्डा पडला आहे.

प्रभाग क्र. ७ इंदोरा ते लघुवेतन कॉलनीकडे जाणाऱ्या रस्त्यावर पाईप लाईन दुरुस्तीसाठी ओसीडब्लूच्या कर्मचाऱ्यांनी रस्ता खोदला होता. पाईप लाईनची दुरुस्ती केल्यानंतर कामगारांनी खड्डा चांगल्याप्रकारे बुजविला नाही. त्यात माती भरून बुजविण्यात आला होता.

पावसाच्या पाण्यामुळे खड्डयातील माती वाहून गेली आणि रस्त्याच्या मधातच मोठा खड्डा तयार झाला. रात्रीच्या अंधारात या खड्डयामुळे अपघाताची शक्यता आहे. या रस्त्याने पादचाऱ्यांसोबतच वाहनचालक देखील येजा करीत असतात. कामाचा दर्जा आणि सुरक्षेकडे दुर्लक्ष केल्यामुळे ही समस्या निर्माण झाली असे राजेश वासनिक यांनी सांगितले अपघाताला आमंत्रण देण्यापूर्वी हा खड्डा बुजविण्यात यावा अशी मागणी राजरत्न टेंभुर्णे, नवीन शहारे, विनय घरडे, विजय सहारे, भूपेश सहारे आणि राजेश जांभुळकर यांनी केली आहे.

## नवीन मंगळवारीत खड्डयाचे साम्राज्य

● प्रदीप पौनीकर
नागपूर, दि. ४:



रस्त्यावर पडलेला मोठा खड्डा

प्रभाग क्र. ५ नवीन मंगळवारी, पोळा मैदानातील रस्त्यावरील खड्डयात पावसाचे पाणी साचत असल्याने मोठ्या प्रमाणात मच्छराची पैदास झाली आहे. त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

पोळा मैदानातील रस्त्यावर अनेक ठिकाणी रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत. पावसाळ्यापूर्वी खड्डयाचे काम करणे आवश्यक होते परंतु, करण्यात आले नाही. त्यामुळे रस्त्यावर पावसाचे पाणी साचते. रस्त्यावर पाणी साचल्याने मोठ्या प्रमाणात मच्छराची पैदास झाली आहे. मच्छरामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.

याप्रकरणी आम आदमी पक्षाच्या कार्यकर्त्यांनी सतरंजीपुरा झोनचे सहायक अभियंता धनंजय जाधय यांना आपल्या मागण्यांचे निवेदन देऊन समस्या दूर करण्याची विनंती केली. दहा दिवसात या समस्या दूर न झाल्यास आम आदमी पार्टीच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी देण्यात आला. यावेळी किसन निमजे, नानक धनवानी, हेमराज कुंभारे, अनिल संभे, सुनील गजभिये, अरूण गुणारकर, संजू पटले आदी उपस्थित होते.

## मनिषनगरात कानडा पंढरीचा राजा

● महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. ४:

रमाकांत जवादे यांच्या वाढदिवसानिमित्त मेट्रो सिटी म्युझिकल ग्रुपच्या वतीने मनिषनगर येथे कानडा पंढरीचा राजा हा कार्यक्रम घेण्यात आला.प्रारंभी संगीत विषारद रवी हातेकर यांनी रमाकांत जवादे आणि माधुरी जवादे यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर गायक अनिल वाकोडे, विभाकर नांदे, उज्वल जोशी, संदीप महाजन,सोनाली रामेलवार, परिता जोडपे, सुनीता धारगावे यांनी विविध गाणी गाऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

## विकास कामासाठी चांगल्या रस्त्याची ऐसी की तैसी

● महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. ४:



काचोरे पाटीलनगरातील चांगल्या रस्त्याची झालेली दुर्दशा

नरेंद्रनगर प्रभागातील चिंचभवन आणि काचोरे पाटीलनगरात विकास कामाच्या नावाखाली चांगल्या रस्त्याची ऐसी की तैसी केली असून भर पावसाळ्यात स्थानिक रहिवाश्यांना खूप त्रास होत असल्याची तक्रार त्या परिसरातील नागरिकांनी केली आहे.

चार महिन्यांपासून या विकास कामांना सुरुवात करण्यात आली. गडर लाईन मोठ्या करायच्या आहेत म्हणून सर्वप्रथम प्रत्येक गल्लीत रस्त्याचे खोदकाम करण्यात आले. खोदलेल्या खड्डयात पाईप टाकले. त्यानंतर पाईप टाकलेल्या खड्डयात माती टाकून कामगार निघून गेले. काही दिवसांपूर्वी पाऊस आल्याने रस्त्यावर चिखल झाला होता. स्थानिक रहिवाश्यांनी आरडाओरड केल्याने खड्डयात गिट्टी टाकून त्यावर रोड रोलर फिरवून सपाटीकरण केले. पावसामुळे गिट्टी बाहेर आल्याने त्यात काळी चुरी टाकून डांबरीकरण करण्यात आले.

रस्त्याचे डांबरीकरण करताना नाल्याच्या काठावर असलेली भिंत पडली. भिंतीचे काम करण्यात आले नाही. नाल्याच्या काठावर कठडे उभे करण्यात आले. या प्रभागात चार लोकप्रतिनिधी आहेत. मात्र, चिंचभवन आणि काचोरे पाटील नगराकडे लक्ष द्यायला या लोकप्रतिनिधींना वेळ नाही. मनपाच्या अधिकाऱ्यांनी सुद्धा घटनास्थळी येऊन पाहणी केली. त्यानंतर पुन्हा भटकलेच नाहीत. त्यामुळे रस्त्याची समस्या आहे तशीच आहे.

आमच्या प्रभाग प्रतिनिधीने या परिसरात फेरफटका मारला असता काम करणाऱ्या कंत्राटदाराला कामाचा काहीच अनुभव नसल्याचे सांगितले. ऐके ठिकाणी काम सुरू असताना दुसरीकडून तक्रार आल्यास पहिल्या कामावरील कामगारांना दुसऱ्या ठिकाणी पाठविल्या जाते. कामगार परप्रांतिय असल्याने कंत्राटदार जसे म्हणेल तसे कामगार काम करतात. दिरंगाईमुळे काम नित्कृष्ट दर्जाचे होत असल्याने कंत्राटदाराला दंड देखील झाला आहे. तरीही कंत्राटदाराची मनमानी सुरू आहे.

या कंत्राटदाराला कुणाचा आशीर्वाद आहे हा संशोधनाचा विषय असल्याचे नागरिकांनी सांगितले.

## विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



● प्रफुल्ल पाटणकर
नागपूर, दि. ४:

राय टाऊन २ येथील सिद्धीविनायक नवयुवक सेवा संघाच्या वतीने इसासनी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.

सर्वप्रथम सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार घालून अभिवादन केल्यानंतर वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. याप्रसंगी बोलताना पंचायत समितीचे माजी सदस्य लीलाधर पटले यांनी आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विद्यार्थी हा विकसित राष्ट्र संकल्पनेचा कणा असून देशाचे उज्वल भविष्य आहे. समाज जडणघडण आणि शिक्षण क्रांतीमध्ये जिल्हा परिषद शाळेचे मोठे योगदान आहे. शिक्षणासोबत सुसंस्कृत समाज निर्मितीचे कार्य करण्यात येते. या ज्ञान मंदिराचे अस्तित्व टिकवून ठेवणे काळाची गरज आहे. यासाठी नागरिकांनी पुढाकार घ्यावा असेही आवाहन त्यांनी यावेळी केले.

युवा सामाजिक कार्यकर्ते अभिषेक मल्लिक यांच्या संकल्पनेतून हा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी माजी ग्रामपंचायत सदस्य दादाराव मसराम, महेंद्र कानुगो,अभिषेक मल्लिक, नरेंद्र पाटील, मानसी थेंबदेवे, ललिता शिरभाते, विकास मोहोड, शेखर राऊत, सुरेखा राऊत, चारू पाटील, द्विवेश पटले, रोहण पाटणकर, आर्यन शिरभाते, पूजा कश्यप यांच्यासह शाळेचे शिक्षक आणि सिद्धीविनायक युवा सेवा संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते.